राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल
क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१५३५/२०२२/धुळे

अपिलार्थी	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
श्री. सुरेश धोंडू जाधव, रा. रामवाडी, विठ्ठल मंदिरासमोर, पंचवटी, नाशिक - ४२२००३	दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय योजना धुळे याचे कार्यालय, चक्करबर्डी रोड, धुळे, ता.जि. धुळे	प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय, त्र्यंबकरोड, नाशिक, ता.जि. नाशिक - ४२२००२

सुनावणी दिनांक – २९/०७/२०२४

१. उपस्थिती –

अपीलार्थी	विद्यमान जन माहिती अधिकारी	तत्कालीन जन माहिती अधिकारी	विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी	तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी
उपस्थित	उपस्थित	अनुपस्थित	उपस्थित	अनुपस्थित

२. द्वितीय अपील अर्ज –

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १५/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उत्तर दिले नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती करण्यात आलेली नाही.

३. माहिती अर्ज –

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २८/१२/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५/०१/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : कालावधी नमूद नाही.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती

जा.क.शादुयो/आस्था/अ-१/९७०/२०२१ दि.२५/११/२०२१ पत्र दि.२२/१२/२०२१ मिळालेल्या पत्राने माझा दिनांक ३/११/२०२१ च्या माहिती अधिकार पत्राला दिलेल्या उत्तराबाबत.

वरील विषयानुसार कळवू इच्छितो की, मुद्दा क्रमांक १ मध्ये चुकीची माहिती सांगीतली आहे. कारण त्यावेळेस प्रमुख लिपीक व व्यवस्थापक साहेब यांना मी सांगीतल की, मला दिनांक ६/१/२०१४ व २३/२/२०१४ रोजी दोन टप्यात रोजंदारी फरक देण्यात आला. त्यानंतर दिनांक ७/११/२०१५ रोजी वेतन निश्चिती झाली. दिनांक २८/८/१९७२ ते दि.३/०६/२००७ पर्यंत वेतन निश्चीती केली, परंतू रोजंदारी फरका मध्ये वेतन निश्चीती प्रमाणे फरक मिळाला नाही तो फरक मिळावा म्हणून मी मागणी केली आहे. त्यामध्ये रजा रोखीकरण व रोजंदारी सेवेमधील रजेच्या रोखीकरण हा पण फरक सुध्दा मिळाला नाही तो पण फरक मिळण्याची मी मागणी केली आहे. दुसरी कालवध्द पदोन्नती दिनांक ९/१०/२००६ पासून दिलेली नाही ती मिळावी व त्यांच्या फरक देण्याची मागणी केली आहे. हे त्यांना त्यांच्याकडे कागदपत्राचे पुरावे दाखवून दिले त्यामुळे त्यांना पटले व त्यांना मी मागीतलेली मागणी मान्य केली ते देण्यास तयार झाले तसेच महा लेखापाल मुंबई यांनी सेवानिवृत्त दिनांक ४/६/२००७ पासून पुढील सेवानिवृत्त वेतनाचा फरक दिला आहे तसेच ग्रॅच्युटी दिल्याची तारीख परंतू चेक नंबर दिलेला नव्हता. मुद्दा क्रमांक २ मध्ये जे काही सांगतात ते चुकीचे आहे कारण आपल्याकडे वारंवार दावा क्रमांक ७०४ सन २००८ च्या निकालास अनुसरुन पहिली कालबध्द पदोन्नती च्या सुधारीत वेतन श्रेणी प्रमाणे वेतन निश्चीती केल्याप्रमाणे रोजंदारी मध्ये फरक काढलेला नाही तो फरक मिळण्याची वारंवार मागणी करत आहे. मुद्दा क्रमांक ३ याचे उत्तर मुद्दा क्रमांक २

मध्ये उल्लेख केलेला आहे. मुद्या क्रमांक ४ प्रमाणे रोजंदारीचा फरक वेतन निश्चीतच्या अगोदर दिला आहे व त्यावर ८ टक्के व्याज दिले आहे त्यात वेतन निश्चीती प्रमाणे फरक काढलेला नाही. तर वेतर निश्चीतीचा फरक दिल्याचा व व्याज दिल्याचा प्रश्न येतोच कुठे. तरी वरीलप्रमाणे मागितलेला फरक मिळावा.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना, धुळे यांचे कार्यालय, चक्करबर्डी रोड, धुळे, ता.जि. धुळे यांनी दि.१३/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे दिसून येते.

४. प्रथम अपील -

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०८/०२/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १०/०२/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांनी दि. १४/०३/२०२२ व दि.१८/०४/२०२२ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना, धुळे यांनी दि.१३/०१/२०२२ नुसार माहिती दिली आहे. तथापी सदरची माहिती श्री. जाधव यांना मिळाली नसल्याने सुनावणीचे वेळी सदरच्या पत्राची प्रत श्री. जाधव यांना देण्यात येवून त्यांची स्वाक्षरी घेण्यात आली. श्री. जाधव यांना माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन अपील निकाली काढण्यात आले.

५. युक्तिवाद/लेखी खुलासा –

विद्यमान जन माहिती अधिकारी – जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना दि.१३/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थी यांना माहिती पुरविण्यात आली असल्याचे स्पष्ट केले.

६. निष्कर्ष –

१) जन माहिती अधिकारी यांनी दि.१३/०१/२०२२ च्या पत्रान्वये अपीलार्थी यांना माहिती पुरविल्याचे दिसून येते.

२) अपीलार्थी यांनी विनंती अर्ज सादर केला असून तो माहिती अर्ज होत नाही.
सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक.१५३५/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. 2066 24 MAR 2025